औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक २९/८/१९८९ रोजी झालेल्या ४१ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

---

दुपारी २.३० वाजता होणारी मंडळाची बैठक कोरम अभावी स्थगित झाली होती. सबब सायंकाळी ६.०० वाजता तहकुब झालेली बैठक घेण्यांत आली. सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] मा. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. अ. म. महाजन | उपसभापती/औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. मा खिजा, आयुक्त, औरंगाबाद विभाग. | सभासद. |

विषय क्र. १:- मंडळाच्या दिनांक २४.७.८९ रोजी झालेल्या ४० व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

---

[१] दिनांक २४.७.८९ रोजी झालेल्या ४० व्या सभेतील विषय क्र. २ वर चर्चा करतांना असा निर्णय घेण्यांत आला की, जिल्हा सरकारी वकील नासिक हयांनी [फौजदारी खटला शासन विरुध्द श्री. बाफना] हया प्रकरणी मागितलेले कागदपत्रे कार्यकारी अभियंता नासिक यांनी त्वरीत जिल्हा सरकारी वकील नासिक हयांना द्यावे.

[२] ४० व्या सभेतील विषय क्र. ८ वर चर्चा करतांना मा. सभापतींनी असे सुचविले की, देवळाली नासिक येथील उच्च उत्पन्न गटातील ६० गाळयाचे बांधकाम ठेकेदारास औरंगाबाद येथे पुढील महिन्यात होणा-या मंडळाच्या बैठकीस हजर रहाण्यास सांगावे.

ठराव क्र. २०१

---

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाच्या ४० व्या सभेच्या कार्यवृत्तांस मान्यता देण्यांत आली व तो कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची परिपूर्ती करणेबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, नासिक विभागातील श्री. आर. बी. लोहार सहाय्यक अभियंता यांच्या मुलास [रक्ताचा कॅन्सर झालेला आहे व त्यासाठी त्यांनी टाटामेमोरिअल हॉस्पीटल मुंबई तसेच टाटामेमोरियल हॉस्पीटल मुंबई हयांनी सुचित केलेल्या स्थानिक डॉक्टरांकडून उपचार घेतलेला आहे. त्यासाठी आलेल्या खर्चाची परिपूर्ती करण्यासाठी त्यांनी यावेळी एकुण रु. ७३९७/- च्या औषधी पावत्या व इतर खर्चाच्या पावत्या सादर केलेल्या आहे.

यापूर्वी सुध्दा लोहार यांना या प्रकरणी रु. २४०३/- चे खर्चाची परिपूर्ती करण्यांत आल्याचेही सांगितले [बैठक क्र. ३५ ]

ठराव क्र. २०२ : चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की, श्री. लोहार यांनी त्यांच्या मुलाच्या आजारावर [रक्ताचा कॅन्सर या रोगावर ] केलेल्या खर्चास रु. ७३९७/- च्या प्रतिपूर्तीस सदर देयक प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारे तपासून प्रतिपूर्ती देण्यास मंजूरी देण्यांत आली.

विषय क्र. ३: वाहन दुरूस्ती खर्चास मंजूरीचे अधिकार मंडळास देणेबाबत.

या विषयी उपसभापतींनी असे विषद केले की, वाहन दुरूस्ती खर्चास मंजूरी देणेचे अधिकार मुख्याधिकारी यांना प्राधिकरणाचे आदेश क्र. ११८६/१७७८७/प्र. १ दि. ८. ९. १९८६ चे बाब ३१ प्रमाणे फक्त रु. ५०००/- पावेतो आहे. हयापेक्षा जास्त अधिकार मंडळाच्या अधिकाऱ्यास अथवा मंडळास प्रदान करण्यांत आलेले नाहीत. परंतु गाडयाची दुरूस्ती ही प्राधिकरणाची मंजूरी येईपर्यन्त थांबविणे कामाचे व प्रगतीचे दृष्टीने शक्य नसते म्हणून प्राधिकरणाकडे खालील प्रमाणे प्रस्ताव पाठविण्याचे ठरले.

ठराव क्र. २०३

चर्चेअंती असा निर्णय घेण्यांत आला की, वाहन दुरूस्ती वरील खर्चास मंजूरी देणेचे अधिकार खालील प्रमाणे असावेत.

| | |
|---|---|
| १] कार्यकारी अभियंता | रु. ५००० पावेतो |
| २] मुख्याधिकारी/औरंगाबाद मंडळ | रु. १५,०००/- |
| ३] औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास | रु. १५,००० पेक्षा जास्त. |

विषय क्र. ४:- पुरग्रस्तासाठीची गृहनिर्माण योजना.

ठराव क्र. २०४

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, पूरग्रस्तांसाठी मंडळातर्फे गृहनिर्माण योजना तत्परतेने कार्यान्वीत करण्यासाठी प्राधिकरणाकडे कार्यकारी अभियंत्यांची दोन विभागीय कार्यालये व चार जीप गाडयाची मागणी करण्यांत यावी.

विषय क्र. ५:- जळगांव एमआयडीसीकडून ताब्यात घेतलेल्या ५ एकर जमिनीवर १७६ अल्प उत्पन्न गटान्तर्गत गाळयांच्या अभिन्यासास मंजूरी प्रदान करणेबाबत.

हा विषय मंडळाने ३२ व्या बैठकीत चर्चीला होता. तेंव्हा उपसंचालक नगररचना हया मंडळाच्या मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे एम. आय. डी. सी. क्षेत्र जळगांव नगरपरिषदे अंतर्गत समाविष्ट झालेले असल्यामुळे नगरपरिषदेकडून नकाशांना मंजूरी मिळवून कामाला सुरुवात करण्यांत आली आहे हे मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट करुन सांगितले की, आता एमआयडीसीने गाळयाचा अभिन्यास मुख्य नगररचनाकार एमआयडीसी मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घ्यावे व त्याशिवाय बांधकाम करु नये असे कळविले आहे. तसेच उपसभापतींनी असेही सांगितले की, मध्यंतरीच्या काळात एमआयडीसीने बांधकामाच्या परवानगीस मुदत वाढ देण्याकरिता मंडळाला रु. ९३,३७५/- शुल्क भरण्याचे कळविले होते ते शुल्क मंडळाने ३०. ३. ८९ रोजी भरलेले आहे.

व परत दिनांक १७/८/८९ च्या पत्राने कार्यकारी अभियंता एमआयडीसी जळगांव यांनी मंडळात कळविले आहे की, नकाशे मंजूर करून न घेतल्यास मंडळाला पाणीपुरवठा व गृहप्रवेश प्रमाणपत्र देता येणार नाही.

याच अनुषंगाने पुर्वी मा. सभापती यांनी मा. ना. श्री. रामराव आदीक, उद्योगमंत्री यांना पत्र लिहून अभिन्यास मंजूर करण्याबाबत विनंती केल्याचेही उपसभापतींनी सांगितले. गेल्या तीन वर्षापासून नकाशे एम. आय. डी. सी. कडे पडून आहेत. व त्यांनी त्याला मंजूरी दिलेली नाही.

ठराव क्र. २०५

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, मंडळाने याप्रकरणी पाठपुरावा करावा व प्राधिकरणाने हे प्रकरण उच्च स्तरावर हाताळावे असा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा.

P. put up letter to [illegible] IA.

मा. सभापतींच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

१] औरंगाबाद येथील हॉटेल प्रिन्स्ट्रावेल समोरील सीटीएस क्र. २०७२१ जमिनीवर बांधण्यांत येत असलेल्या १६ एचआयजी गाळयांच्या बांधकामाबाबत.

. . .

ठराव क्र. २०६

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, १६ एचआयजी गाळयाच्या बांधकाम ठेकेदारास [ मे. आर. के. कन्स्ट्रक्शन कं. यांना ] मंडळाच्या पुढील महिन्यात होणाऱ्या बैठकीच्या वेळी सविस्तर चर्चा करण्यासाठी बोलवावे.

२] विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज.

ठराव क्र. २०७

विशेष नियोजन प्राधिकरणाच्या प्रारुप रचनात्मक आराखडयावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, वाळूज विशेष नियोजन प्राधिकरणातील अधिसूचीत झालेल्या जमिनीचा रचनात्मक आराखडा प्राधिकरणाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सौ. औटी प्रभारी सहाय्यक संचालक नगररचना [वाळूज] व श्री. कुलकर्णी सहाय्यक नगररचनाकार यांनी स्वत: मुंबईस जावून रचनात्मक आराखडा प्राधिकरणास संबंधीत कागदपत्रासह सादर करावा. सदर आराखडा सर्व्हे शीटसवरून तपासण्यात यावा. काही त्रुटी आढळल्यास त्याप्रमाणे बदल करण्यांत यावेत. हया कामाकरिता नेमलेले सहाय्यक संचालक नगररचना [ श्री. नंदीमठ ] हे महिन्यापासून सतत सुटीवर असल्यामुळे तसेच त यांची मुंबईला बदली झाल्याने हया कार्यालयातून कार्यमुक्त करण्यांत आल्यामुळे रचनात्मक आराखडयातील त्रुटी दुरुस्तीचे काम तसेच आरक्षण दाखविण्याचे काम हे प्राधिकरणाच्या स्तरावर करण्याची विनंती करण्यांत यावे असे ठरले.

. . .